राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या
वाहतूक भत्याच्या (Transport Allowance)
दरात सुधारणा करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
शासन शुद्धीपत्रक- क्रमांक:- वाहन-२००९/प्र.क्र.७८/सेवा-५
दिनांक :- ७ सप्टेंबर २०११

पहा:- शासन निर्णय,वित्त विभाग,क्र-वाहभ-२००९/प्र.क्र.७८/सेवा-५, दिनांक:-५ एप्रिल २०१०

## शुद्धीपत्रक

शासन निर्णय,वित्त विभाग,क्र.-वाहभ-२००९/प्र.क्र.७८/सेवा-५,दिनांक ५ एप्रिल २०१० मधिल परिच्छेद ३ (तीन) नंतर पुढील उप परिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे.

"(चार) कर्तव्य स्थानापासून एक किलोमीटरच्या आत किंवा कर्तव्यस्थान किंवा निवासस्थान यांचा एकत्र परिसर असेल अशा ठिकाणी राहणाऱ्या अंध,अस्थिव्यंगाने अधू आणि कण्याच्या विकाराने पीडित असणाऱ्या राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना वरील तक्त्यात नमूद केलेल्या दराच्या निम्म्या दराने,मात्र अशा प्रकारे दर निम्मा केल्याने तो रू. १०००/- पेक्षा कमी होत असल्यास, किमान रू.१०००/- या दराने वाहतूक भत्ता मंजूर करण्यात येईल."

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक २०११०९०७१४०६१०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(स.अ.मु. नकवी)
शासनाचे उपसचिव

प्रति,
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
मंत्रालयीन सर्व विभाग
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि.अहमदनगर
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे